# हिवाळी-२०२३ सत्र परीक्षा देगलूर महाविद्यालयात सुरू

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देगलूर** ■ येथील अडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या देगलूर महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर हिवाळी-२०२३ च्या सत्र परीक्षा सुरू आहेत. या परीक्षा केंद्रावर देगलूर शहर आणि तालुक्यातील मरखेल येथील एकूण सुमारे १५ हजार विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

२९ नोव्हेंबरपासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखा तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षांना सुरुवात झाली आहे. येथील अडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या देगलूर महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर बीए, बीकॉम, बीएससी, बीसीए, एमसीजे, फॅशन डिझाईन तसेच फार्मसीच्या हिवाळी-२०२३ च्या सत्र परीक्षा सुरू आहेत. या परीक्षा केंद्रावर शहरातील सिंधू महाविद्यालय, वै.धुंडा महाराज महाविद्यालय तसेच मरखेल ता.देगलूर येथील फार्मसी कॉलेजचे एकूण १४ हजार ९०० विद्यार्थी परीक्षा देत आहेत.या परीक्षा केंद्राला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा तथा मूल्यमापन संचालक डॉ.दिगंबर नेटके यांनी भेट देऊन परीक्षेचे कार्य व्यवस्थित आणि शिस्तबद्धपणे सुरू असल्याचा अभिप्राय दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा केंद्रप्रमुख म्हणून डॉ.किशन सुनेवार, सहकेंद्रप्रमुख राजकुमार पोकलवार, वरिष्ठ लिपिक प्रशांत चौहाण, अशोक मामीडवार, अंतर्गत दक्षता पथकातील डॉ.नीरज उपलंचवार, प्रा.एस. आर. हाके, प्रा. रेणुका ध्याडे, प्रा. धनश्री रूद्रकंठवार यांच्यासह उदयकुमार कुमठेकर, श्याम कळसकर, रेखा इळेगावकर आदी परीक्षा सुरळीतपणे पार पडण्यासाठी परिश्रम घेत आहेत. देगलूर महाविद्यालयात परिक्षा सुरूळत सुरू असल्याने विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



Scanned with OKEN Scanner